आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२९ जुलै २०२४ -सोमवार

**ठळक बातम्या**

- जातीआधारित जनगणना करण्याची, तसंच शेतकऱ्यांना किमान आधारभूत दराची कायदेशीर हमी देण्याची लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची मागणी

- दिल्लीतल्या कोचिंग क्लासमधे विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाल्याप्रकरणी सखोल चौकशी करण्याची राज्यसभेत भाजपा सदस्याची मागणी

- लष्कराच्या चिलखती वाहनांसाठी Advanced Land Navigation System खरेदी करायला संरक्षण खरेदी परिषदेची प्राथमिक मंजुरी

- राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रताप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाची अजित पवार आणि त्यांच्या सोबतच्या आमदारांना नोटीस

**आणि**

- पॅरिस ऑलिम्पिकमध्ये बॅडमिंटनच्या पुरुष दुहेरीत सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी ही भारतीय जोडी पुढच्या फेरीत दाखल

**<><><><><>**

जातीआधारित जनगणना करावी आणि किमान आधारभूत किंमतीची कायदेशीर हमी शेतकऱ्यांना द्यावी, अशी मागणी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज केली. इंडिया आघाडीचं सरकार आल्यास या दोन्ही गोष्टी करण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. केंद्रीय अर्थसंकल्पात देशाच्या

लोकसंख्येच्या ७३ टक्के असलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांसाठी काहीच तरतुदी नसल्याचा आरोप त्यांनी केला. पेपरफुटीचाही मुद्दा त्यांनी उपस्थित केला. तत्पूर्वी, केंद्रीय अर्थसंकल्पात शिक्षण क्षेत्रासाठीची तरतूद सातत्यानं कमी केल्याचा आरोप समाजवादी पक्षाच्या डिंपल यादव यांनी केला. भाजपाचे खासदार सुरेश कुमार कश्यप यांनी अर्थसंकल्पाची प्रशंसा केली. हा अर्थसंकल्प देशाला नवी दिशा देईल आणि देशाला आत्मनिर्भर करेल, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

दिल्लीतल्या कोचिंग क्लासमधे विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाल्याप्रकरणी राज्यसभेत आज अल्पकालीन चर्चा झाली. भाजपाचे डॉ. सुधांशू त्रिवेदी यांनी चर्चेला सुरुवात केली. अक्षम्य निष्काळजीपणामुळे हा प्रकार घडल्याचा आरोप करून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली. तृणमूल काँग्रेसचे डेरेक ओब्रायन यांनी या घटनेबद्दल चिंता व्यक्त केली. मात्र, रेल्वे अपघात, मणिपूरमधला हिंसाचार, नीट परीक्षा इत्यादी विषयांवर चर्चा करण्याची परवानगी सभागृहाने का दिली नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी या प्रकरणातल्या दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली. अशा प्रकारची प्रशिक्षण केंद्र दिल्लीत बेसुमार वाढत असल्याचं मत आम आदमी पक्षाच्या स्वाती मलिवाल यांनी मांडलं. याशिवाय शिवसेनेच्या प्रियांका चतुर्वेदी, समाजवादी पक्षाच्या जया बच्चन इत्यादी खासदारांनी या चर्चेत सहभाग घेतला.

<><><><><>

संरक्षण खरेदी परिषदेच्या आज झालेल्या बैठकीत लष्कराच्या चिलखती वाहनांसाठी Advanced Land Navigation System खरेदी करायला प्राथमिक मंजुरी देण्यात आली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. तटरक्षक दलासाठी २२ बोटी खरेदी करायलाही परिषदेनं प्राथमिक मंजुरी दिली. दरम्यान, संरक्षण मंत्रालयानं आज राष्ट्रीय शेअर बाजारासोबत सामंजस्य करार केला. सूक्ष्म, लघू, मध्यम कंपन्यांना NSE च्या या कंपन्यांसाठीच्या विशेष व्यासपीठाद्वारे निधी उभारता येतो. संरक्षण मंत्रालयासोबत काम करणाऱ्या अशा कंपन्यांमध्ये या व्यासपीठाद्वारे निधी उभारण्यासाठी जनजागृती केली जाणार आहे.

<><><><><>

उडान योजनेअंतर्गत सध्या १३ हेलिकॉप्टर तळांसह ८५ विमानतळांना जोडणारे ५७९ मार्ग कार्यरत असल्याची माहिती नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी राज्यसभेत लेखी उत्तराद्वारे दिली. देशभरात २१ नवे हरित विमानतळ उभारण्याची तत्वतः परवानगी केंद्र सरकारनं दिली असून यापैकी १२ हरित विमानतळ गेल्या १० वर्षांमध्ये कार्यरत झाल्याचंही मोहोळ यांनी सांगितलं.

<><><><><>

व्हेनेझुएलाच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत निकोलस मादुरो विजयी झाल्याची घोषणा राष्ट्रीय निवडणूक परिषदेने केली आहे. मादुरो सलग तिसऱ्यांदा अध्यक्षपदी निवडून आले आहेत. ८० टक्के मतपत्रिकांची

मोजणी झाली असून मादुरो यांना ५१ टक्के मतदान झाल्याचं निवडणूक परिषदेचे एल्विस अमोरोसो यांनी सांगितलं. एकूण मतदारांपैकी २१ दशलक्ष मतदारांनी निकोलस मादुरो यांना आपली पसंती दर्शवली आहे.
दरम्यान हा निकाल फसवा असून याला कायदेशीर आव्हान देणार असल्याचं विरोधी पक्षांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस अपात्रता प्रकरणी सर्वोच्च न्यायालयानं आज अजित पवार आणि त्यांच्या सोबत असलेल्या आमदारांना नोटीस बजावली आहे. शरद पवार यांनी विधानसभा अध्यक्षांनी दिलेल्या निकालाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. उद्धव ठाकरे यांनीही अशाच प्रकारची याचिका सादर केली आहे. दोन्ही याचिकांवर सर्वोच्च न्यायालय एकाचवेळी निर्णय घेणार आहे. या नोटीशीला उत्तर आल्यानंतर याचिका सुनावणीसाठी घ्यायच्या किंवा नाही हे सर्वोच्च न्यायालय ठरवणार आहे.

**<><><><>**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज नेमबाजी स्पर्धेत १० मीटर एअर रायफल प्रकाराच्या अंतिम फेरीत पुरुष गटात अर्जुन बबुता आणि महिला गटात रमिता जिंदल यांना पदक मिळवण्यात अपयश आलं. अंतिम क्रमवारीत रमिता सातव्या स्थानावर तर अर्जुन चौथ्या स्थानावर राहिल्याने त्याचं पदक थोडक्यात हुकलं. बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष दुहेरीत सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी ही जोडी पुढच्या फेरीत गेली. त्यांचा सामना

उद्या इंडोनेशियाच्या फजर अल्फीयान आणि मुहम्मज रियान अर्डिअंटो या जोडीशी होईल. आज पुरुष हॉकीत भारत आणि अर्जेंटीनामधला सामना बरोबरीत सुटला. सामन्याच्या सुरुवातीला अर्जेंटीनाने भारतावर 1-0 अशी आघाडी घेतली, मात्र नंतर भारताच्या चमूने अर्जेंटीनाशी बरोबरी केली. पुढच्या फेरीत भारताचा सामना आयर्लंडबरोबर होईल. धीरज बोमदेवरा, तरुणदीप राय, आणि प्रवीण जाधव या भारतीय नेमबाज चमूची कामगिरी आज निराशाजनक ठरली. त्यामुळं उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात त्यांना पराभव स्वीकारावा लागला. तुर्कीयेच्या नेमबाज चमूनं भारतीय नेमबाजांचा ६-२ असा पराभव करत उपांत्य फेरी गाठली.

**<><><><><>**

मुंबईची जिया राय, इंग्लिश खाडी सर्वात कमी वेळात पार करणारी जगातली सर्वात कमी वयाची दिव्यांग जलतरणपटू ठरली आहे. जिया हिनं हे ३४ किलोमीटरचं अंतर २८ आणि २९ जुलैदरम्यान १७ तास, २५ मिनिटांमध्ये पार केलं.

**<><><><><>**

गुवाहाटीच्या विशेष न्यायालयानं आसाम लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष राकेश पॉल यांना कृषी विकास अधिकारी भरती घोटाळाप्रकरणात १४ वर्षांचा सश्रम कारावास आणि दोन लाख रूपयांचा दंड ठोठावला आहे. तसंच आसाम लोकसेवा आयोगाचे सदस्य बसंता कुमार डोले आणि समेदुर रहमान यांना १० वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा आणि दोन लाख रूपयांचा दंड

ठोठावला आहे. तर अन्य २९ आरोपींना प्रत्येकी चार वर्षांच्या तुरूंगवासासह १० हजार रूपयांचा दंड ठोठावला आहे.

**<><><><><>**

जागतिक  बाजारांमधली तेजी आणि परदेशी निधीचा ओघ या पार्श्वभूमीवर देशातल्या शेअर बाजारांनी आज विक्रमी पातळी गाठली मात्र दिवसअखेर ती टिकवण्यात अपयश आलं. बाजार उघडल्यापासून असलेली तेजी दुपारी वाढली आणि सेन्सेक्सनं ८१ हजार ९०८ अंकांचा आणि निफ्टीनं सुमारे २५ हजारांच्या पातळीला स्पर्श केला. सेन्सेक्स पावणे सहाशे आणि निफ्टी १६५ अंकांनी वधारला होता. मात्र त्यानंतर सुरू झालेल्या नफेखोरीनं दोन्ही निर्देशांक घसरले. दिवसअखेर सेन्सेक्स २३ अंकांनी वधारून ८१ हजार ३५६ आणि निफ्टी १ अंकांची वाढ नोंदवून २४ हजार ८३६ वर बंद झाला.

**<><><><><>**

दिव्यांगांसाठी एकाच छताखाली प्रशिक्षण, समुपदेशन, वैद्यकीय सहायता या सर्व सुविधा देणारं पुनर्वसन केंद्र सर्व महापालिकांनी सुरू करावं, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. ते आज मुंबईत दिव्यांग कल्याण महामंडळाच्या बैठकीत बोलत होते. दिव्यांगांना कौशल्य विकासाचं प्रशिक्षण देणारी योजना तयार करतानाच, त्यांच्यासाठी कर्जाची मर्यादा ५० हजारावरुन अडीच लाख रुपयांपर्यंत वाढवावी, असे निर्देश त्यांनी दिले. राज्यातल्या दिव्यांगांना यंदाही रोजगार, स्वयंरोजगारासाठी ई-

रिक्षा वाटप करण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला. त्यानुसार यावर्षी ६६७ रिक्षा खरेदी करण्यासाठी आजच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

<><><><><>

लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचं सभागृहातलं वर्तन, त्यांना राज्यघटनेबद्दल आदर नसल्याचं दाखवून देणारं आहे, अशी टीका माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली आहे. राहुल गांधी लोकसभेच्या सभापतींना सातत्यानं प्रश्न विचारत राहिले त्यांचं हे वर्तन निषेधार्ह असल्याचं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

शल्यविशारद, बालरोगतज्ञ आणि मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलगुरु डॉ. स्नेहलता देशमुख यांचं आज सकाळी मुंबईत निधन झालं. त्या पंचाऐंशी वर्षांच्या होत्या. गर्भसंस्कार, नवजात शिशू तसंच माता यांच्या आहारासंदर्भात त्यांनी महत्वपूर्ण काम केलं आहे. मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरू म्हणून १९९५ मध्ये त्यांची नियुक्ती झाली. कुलगुरुपदाच्या आपल्या कारकिर्दीत त्यांनी विद्यापीठाच्या पदवी प्रमाणपत्रावर विद्यार्थ्याच्या आईचं नावही नमूद करण्यासारखे महत्वाचे निर्णय घेतले.

//<><><><><>//